महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/ २६ /२०२३ दि. १८/०२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीतील शिव मंदिर येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी दिनांक १८/०२/२०२३ रोजी **'महाशिवरात्री'** उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) हिंदु स्मशानभूमीकडून गोविंद तीर्थ पुलाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना हिंदु स्मशानभूमी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वैभव हॉटेलकडून हिंदु स्मशानभूमी येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक – हुतात्मा चौक – मटका चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वैभव पेट्रोल पंपाकडून अंबरनाथ रेल्वे स्टेशन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना वैभव पेट्रोल पंपासमोर वैभव हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने आनंदनगर एमआयडीसी – टी जंक्शन – फॉरेस्ट नाका – लादीनाका – डीएमसी चौक अंबरनाथ पश्चिम येथून यु टर्न घेवून मार्गाने परत जातील.

**प्रवेश बंद –** ३) मटका चौकाकडून हुतात्मा चौकाकडे जाणा–या जड अजवड वाहनांना मटका चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नमूद मार्गावरून जाणारी हलकी वाहने ही कानसई सेक्शन मार्गाने हुतात्मा चौकातून स्वामी समर्थ चौकात येतील व त्याच मार्गाने परत जातील.

**प्रवेश बंद –** ४) अंबरनाथ आनंदनगर एमआयडीसी व शिवाजीनगर मार्गे येणा–या हलक्या वाहनांना रोटरी क्लब येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नमूद मार्गावरून जाणारी हलकी वाहने रोटरी क्लब – शहिद मुरलीधर चौधरी चौक – राहुल नगर मार्गे – बी केबीन येथे येतील व त्याच मार्गाने परत जातील.

**प्रवेश बंद –** ५) कैलास कॉलनी, उल्हासनगर नं ५ कडून स्वामी समर्थ चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना कैलास कॉलनी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कैलास कॉलनी येथून पालेगांव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ कडून अंबरनाथ शिव मंदिराकडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना उल्हासनगर, समतानगर, स्मशानभुमी, कैलास कॉलनी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
७) उल्हासनगर कॅम्प नं. ५ दुधनाक्याकडून कैलास कॉलनीकडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना ओटी सेक्शन येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने सेक्शन ३९ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ८) भाटीया चौक ते कुर्ला कॅम्प रोड, कैलास कॉलनी चौक, जुना बस स्टॉप, दुधनाका, मठ मंदिर, लाल चक्की चौक येथून हिललाईन पो. स्टे. समोरील रोड, न्यु इंग्लिश स्कुल समोरील रोड, नेताजी चौक ते पुन्हा भाटीया चौक पर्यत मुख्य रस्त्यावर माल वाहतूक, जड अवजड वाहने वाहतुकीकरीता दिनांक १७/०२/२०२३ रोजी १८:०० ते १९/०२/२०२३ रोजी सकाळी ०६:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

CamScanner

सदरची अधिसुचना दिनांक १७/०२/२०२३ रोजी १८:०० ते दिनांक १९/०२/२०२३ रोजी पहाटे ०४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.

CamScanner